**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR 416 004 MAHARASHTRA**
PHONE :EPABX-2609000 GRAM : UNISHIVAJI
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - 416 004 महाराष्ट्र**
ESTD 1962
"A" GRADE NAAC
F & A. O. Phone No.- 0231-2609066 Pay Bill Section Phone No. 0231-2609082
web site : www.unishivaji.ac.in. Email id – paybills@unishivaji.ac.in

संदर्भ: शिवाजीविद्या./पगारपत्रके/डि.वाय/आयकर 2019-20/5944 दिनांक- 13 जून, 2019

प्रति,

1. मा.अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक
   सर्व अधिविभाग/सेंटर्स/चेअर्स
   शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

2. उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/विभागप्रमुख
   सर्व प्रशासकीय विभाग
   शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय : आयकर सवलत मिळणेसाठी गुंतवणूक करणेत आलेली / येणारी रक्कम कळविण्याबाबत.
संदर्भ : या कार्यालयाचे जा.क. शिवाजी विद्या./पगारपत्रके/डि.वाय/आयकर 2019-20 दिनांक 16 एप्रिल 2019 रोजीचे परिपत्रक.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय विषयांन्वये आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, आयकर नियम 1961 मधील कलम 192 प्रमाणे संपूर्ण वर्षामध्ये मिळणा-या वेतन व इतर भत्त्यांची रक्कम करमुक्त मर्यादेहून जास्त असेल तर वेतन आदा करण्या-या अधिका-यावर पगार आदा करताना कपात करण्याची जबाबदारी असते. यासंदर्भात आयकर कार्यालयास मासिक, त्रैमासिक व वार्षिक अहवालामध्ये प्रत्यक्षात आदा केलेले वेतन व त्या वेतनातून करमुक्त असलेल्या वजावटी यांची माहिती विहित प्रपत्राद्वारे दिली जाते. याबाबत विद्यापीठातील सर्व शिक्षक व प्रशासकीय सेवक यांनी सन 2019-20 या आर्थिक वर्षामधील आपले अपेक्षित उत्पन्न व आयकर सवलत मिळणेसाठी गुंतवणूक करणेत आलेली / येणारी रक्कम या संदर्भातील तपशीलवार माहिती देवून अंदाजे करपात्र उत्पन्न व भरावा लागणारा आयकर/अधिभार याचे स्वनिर्धारण करून त्या बाबतची माहिती विहित नमुन्यात पगारपत्रके विभागास सादर करणे बाबत उपरोक्त संदर्भीय पत्रांन्वये कळविण्यात आले होते.

तथापी, विद्यापीठातील अद्याप काही शिक्षक व प्रशासकीय सेवक यांनी सन 2019-20 या आर्थिक वर्षामधील आपले अपेक्षित उत्पन्न व आयकर सवलत मिळणेसाठी गुंतवणूक करणेत आलेली / येणारी रक्कम या संदर्भातील तपशीलवार माहिती, अंदाजे करपात्र उत्पन्न व भरावा लागणारा आयकर/अधिभार याचे स्वनिर्धारण करून त्या बाबतची माहिती विहित नमुन्यात पगारपत्रके विभागास सादर केलेली नाही.

त्यामुळे काही सेवकांची वेतनातून आयकरापोटी होणारी कपात ही जादा प्रमाणात होत असून सदरची माहिती दिनांक 18 जून 2019 पर्यंत पगार पत्रके विभागात समक्ष येवून गुंतवणूक कागदपत्रांची पूर्तता करावी. **तसेच ज्या शिक्षक / प्रशासकीय सेवक यांनी आपले आयकर कपातीचे अर्जानुसार योग्य त्या नोंदी संगणक प्रणालीमध्ये झाल्या आहेत किंवा कसे याबाबतची खात्री विद्यापीठाच्या संकेत स्थळावर Employee Corner येथे करून घ्यावी व त्यानुसार काही दुरूस्ती असल्यास पगार पत्रक विभागास सादर करावी. याबाबत सर्वस्वी जबाबदारी संबंधितांची राहील यांची कृपया नोंद घ्यावी.**

आपला विश्वासू,

वित्त व लेखाधिकारी

सोबत : वरील प्रमाणे

टिप : सर्व अधिविभागप्रमुख तसेच सर्व उपकुलसचिव/सहा.कुलसचिव प्रशासकीय विभागप्रमुख यांनी सदरचे पत्र आपल्या विभागातील सर्वांच्या निदर्शनास आणावे.
तसेच सर्व स्विय सहायक यांनी वरिष्ठम् अधिकारी यांचे सदरचे अर्ज भरून या कार्यालयास सादर करावेत.

C:\Users\admin\Desktop\Dhairyasheel\IT REPORT MONTHLY\circular.docx